जा.क्र. ग्रा. पं./का. वि./८९३/१९२
सातारा जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग-२
सातारा दिनांक १८/११/२०२२

# सुधारीत जाहिर दरपत्रके मागणी सुचना क्रमांक-१

## जिल्हा परिषद सेस,"नाविन्यपूर्ण योजना"जिल्हा परिषद, सातारा

**जिल्हा परिषद सातारा सेस मधून नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत महाबळेश्वर तालुक्यातील कांदाटी खो-यातील ५६ गावांपैकी प्रथम टप्प्यात १६ गावांचा एकात्मिक विकास आराखडा तयार करणेसाठी सेवाभावी संस्थांकडून स्वारस्य अभिव्यत्की/प्रकटन स्वरुपात दरपत्रके मागविणेत येत आहेत.(Expression of Interest)**

**दरपत्रके सादर करणेसाठी पात्र संस्था**-दिनांक २४ ऑगस्ट २०११ च्या शासन निर्णय क्रमांक व्हिपीएम २०११/प्र.क्र.१७३/पंरा-४ नुसार एकात्मिक विकास आराखडा तयार करण्यासाठी निवडलेल्या तांत्रिक सेवा पुरवठादार संस्था

जिल्हा परिषद सेस, नाविन्यपूर्ण योजनेंतर्गत महाबळेश्वर तालुक्यातील कांदाटी खो-यातील एकूण ५६ गावांपैकी पहिल्या टप्प्यात १६ गावांचा एकात्मिक विकास आराखडा तयार करणेसाठीच्या ग्रामपंचायती गांवे/वाडया-वस्त्या खालीलप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | ग्रामपंचायत/गाव/वाडी-वस्तीचेनांव | तालुका | लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) |
|---|---|---|---|
| १ | | | |
| २ | सोबतजोडलेल्या यादीप्रमाणे | | |
| ३ | | | |

१. कामाची व्याप्तीः

कामाची व्याप्ती पुढील प्रमाणे असेल.

१.१ प्रकल्पाचे क्षेत्रनिश्चितकरणे म्हणजे गाव व गावातील वाड्या, वस्त्या व वसाहती आणित्यांचे प्रादेशिक स्थान आणि सुविधांच्या दृष्टीने महत्व.

१.२ गावाची सद्यस्थितीजाणूनघेण्यासाठी गावाच्या पर्यावरणीय, सामाजिक व आर्थिक बाबींविषयी पायाभूत माहिती गोळा करणे आणि माहितीचेSWOTपद्धतीने विश्लेषण करणे.

अ. लोकसंख्या विषयक माहिती (लोकसंख्या, स्त्री-पुरूष प्रमाण, साक्षरता, वयोगटाप्रमाणे लोकसंख्याविभाजन, कामकरणारी लोकसंख्या, आरोग्य विषयक माहिती, प्रमुख व दुय्यम व्यवसाय आणि पशुधन)

ब. भौगोलिक माहिती (क्षेत्र, भौगोलिक स्थान, दळणवळणाच्या सुविधा, ऐतिहासिक महत्व, जमिनीचा वापर, कृषी व सिंचन, आपत्ती प्रवणक्षेत्र, उद्योग व्यवसाय, पर्यटनविकास आणिपर्यावरण दृष्ट्या संवेदनशील भाग)

क. पर्यावरण विषयक माहिती (पाणी पुरवठा, पर्यावरणीय स्वच्छता, भूजल व भूपृष्ठावरील पाण्याची उपलब्धता आणिगुणवत्ता, हवेची गुणवत्ता, ध्वनी, मैला व घनकचरा व्यवस्थापन, जैववैविध्य व जंगल व्याप्ती)

ड.गावातील पायाभूत सुविधा (दळणवळण, पाणी पुरवठा व स्वच्छता, सार्वजनिक सोयी सुविधा, शैक्षणिक सुविधा, आरोग्य सुविधा, उर्जा, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन)ई.दारिद्रयनिर्मूलन व उपजिविकेच्या पर्यायांचे विश्लेषण

१.३ टोपोशीट, खसारा नकाशा व गुगल प्रोइमेज यांचा वापरकरून आर्क जी. आय. एस. प्लॅटफॉर्मवर आधारभूत नकाशा(Base map) व अन्य नकाशे (वाडी-वस्ती, दळणवळण, ड्रेनेज, जमिनीचा वापर, सार्वजनिक सुविधा, पाणी पुरवठा आणि स्वच्छता, पर्यावरण दृष्ट्या संवेदनशील भाग आणि औद्योगिकइ.) आणि प्रस्तावित एकात्मिक विकास आराखडयाचा नकाशा तयार करणे.

१.४ ग्राम विकास आराखडयामध्ये खालील घटकांचा समावेश असावा. एकात्मिक विकास आराखड्याची ध्येये निश्चिती करणे हा एकात्मिक विकास आराखडा व प्रक्रियेचा महत्वाचा भाग असावा.लोक सहभागातून एकात्मिक विकास आराखडयाचे नियोजन करणे.

१. पर्यटन विकास-साहसी पर्यटन,जलपर्यटन,निसर्गपर्यटन इ.
२. वनउपज व औषधी वनस्पती व इतर उत्पादने
३. शाश्वत शेती व सेंद्रिय शेती–Farming systems, Cropping patterns, Agroforestry, Horticulture, Silviculture, Social forestry and Afforestation etc.
४. जलसंधारण- शेतीसाठी पाणी उपलब्धता व पाण्याचा ताळेबंद
५. घनकचरा व्यवस्थापन (पर्यावरण पूरक तंत्रज्ञानाचा वापर करून कचरा गोळा करणे व त्यावर प्रक्रिया करणे)
६. पर्यावरण आणि जैववैविध्य संरक्षण
७. अपारंपारिक आणि अक्षय ऊर्जा स्त्रोतांना चालना देणे
८. पायाभूत आरोग्य सोयीसुविधा व समतोल पोषण आहार यांची उपलब्धता
९. शैक्षणिक सुविधांची उपलब्धता- Digitization of Schools/e-learning
१०. पायाभूत सुविधा - पिण्याचे पाणी, पक्कीघरे, अंतर्गत रस्ते व इतर सार्वजनिक सुविधा
११. रोजगार आणि उपजिविका निर्मितीमध्ये स्थानिक उपलब्ध संसाधनांचा उपयोग व व्याप्ती
१२. युवक कल्याण व स्थानिक व्यावसायिक संधी
१३. महिला,युवती सक्षमीकरण व बालकल्याण
१४. प्रशासनाचे सशक्तीकरण-Application of Digital Platforms & Digital tools
१५. निधीचे व्यवस्थापन - आर्थिक साक्षरता
१६. आदर्श व विकसीत ग्राम होण्यासाठी गावाचा क्षमता बांधणी व क्षमताविकास आराखडा

२. प्रस्तावित एकात्मिक विकास आराखडयातील आदर्श व विकसीत गावाची संकल्पना तयार करताना गावातील नैसर्गिक साधन संपत्तीवर कोणतेही दुष्परिणाम होणार नाहीत याची काळजी घ्यावी लागेल आणि ज्या पर्यायांची अंमलबजावणी होऊ शकेल अशा तांत्रिक व आर्थिकदृष्ट्या योग्य पर्यायांची निवड करणे.

३. पुढील एक/दोन वर्षासाठी प्रकल्पाची प्राथमिकता ठरवून सध्याच्या शासकीय योजनांचे समन्वयन करून अंमलबजावणी आराखडा तयार करणे.(Convergence of Central and State Govt. Schemes)

वरीलप्रमाणे महाबळेश्वर तालुक्यातील कांदाटी खो-यातील ५६ गावांपेकी प्रथम टप्प्यातील १६ गावातील एकात्मिक विकास आराखडा तयार करण्यासाठी शासन निर्णयातील पात्र व इच्छूक तांत्रिक सेवा पुरवठादार संस्थांनी त्यांची दरपत्रके दिनांक२५/११/२०२२ पर्यंत सुटटीचे दिवस वगळून कार्यालयीन वेळेत (सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ पर्यंत) दोन लिफाफा पध्दतीने स्वतंत्र सिलबंद लखोटयात खालील पत्त्यावर पोहोच होतील अशा रितीने सादर करणे आवश्यक आहे.

या योजने अंतर्गत एकात्मिक विकास आराखडा तयार करण्यासाठी स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

**लखोटा- अ) तांत्रिक -**

१. संस्थेचेनाव व पत्ता
२. पॅननंबर
३. जी.एस.टी./सर्व्हिस टॅक्स रजिस्ट्रेशननंबर
४. प्रस्तावित गट प्रमुख व सर्व सदस्यांचे नाव, पद, शैक्षणिक पात्रता व अनुभव (बायोडाटा जोडणे)
५. एकात्मिक विकास आराखडयांतर्गत आजअखेर करण्यात आलेली/चालु कामांची माहिती
६. अशा प्रकारची इतर करण्यात आलेली कामे(मागील १० वर्षे)
७. संस्थेचे मागील तीन वर्षाचे आर्थिकविवरण
८. संस्थेची विविध ठिकाणी असलेली Empanelmentची माहिती
९. संस्थेने विविध Multilateral & Bilateral फंडींग एजन्सी बरोबर केलेल्या कामाचा अनुभव
१०.या प्रकारच्या सरकारी प्रकल्पांचे मुल्यमापन / संशोधन प्रकल्प केले असल्यास त्याचे विवरण

**ब)आर्थिक-** वरील नमूद पहिल्या टप्प्यातील १६ गावांसाठीचा एकात्मिक विकास आराखडा तयार करणेचे एकत्रित दरपत्रक (सर्व प्रकारच्या कर व खर्चासहीत) सादर करणे

तांत्रिक लखोटयाच्या छाननीनंतर निवडक संस्थांना सादरीकरणासाठी बोलावण्यात येईल व त्यातून निवडलेल्या तीन संस्थांची दरपत्रके उघडण्यात येतील.

**दरपत्रके सादर करण्यासाठी पत्ताः**

**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**४ था मजला,जिल्हा परिषद, सातारा**
**सातारा-कोरेगाव रोड, पिन-४१५००१**

मुख्य कार्यकारी अधिकारी,
सातारा जिल्हा परिषद सातारा

<u>जिल्हा परिषद सेस- नाविन्यपूर्ण योजना</u>

विषयः- कांदाटी खोरे एकात्मिक विकास आराखडा मधील गावांची यादी.

| अ.क्र. | गावाचे नाव | कुटूंब संख्या | लोकसंख्या |
|---|---|---|---|
| १ | आकल्पे | ८९ | ४१६ |
| २ | आरव | ३९ | १५१ |
| ३ | लामज | १०३ | ४१५ |
| ४ | म्हाळुंगे | १३ | ७६ |
| ५ | मोरणी | १९ | ८० |
| ६ | निवळी | ४३ | १३२ |
| ७ | पर्वती. त. वाघावळे | ७३ | ४२० |
| ८ | पिंपरी. त. तांब | ४२ | १६९ |
| ९ | दरे तांब | ३७ | १५७ |
| १० | साळोशी | ५० | १५७ |
| ११ | दोडणी | २ | १५ |
| १२ | कांदाट | २३ | १३९ |
| १३ | शिंदी | ३७ | १०८ |
| १४ | उचाट | ५३ | २१६ |
| १५ | वळवण | ५१ | २१० |
| १६ | चकदेव | १३ | ६१ |
| एकूण | | ६८७ | २९२२ |